# पशुवैद्यकीय व पशुविज्ञान महाविद्यालय, अकोला

मुर्तिजापूर रोड, गेट क्र. 8, जुना जकात नाका, कृषिनगर, अकोला. 4444104

(महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर)


## पाडकामाचा सिलबंद लिफाफा पद्धतीने लिलाव

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर अंतर्गत पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, अकोला च्या परीसरातील जुने शिकस्त कुक्कुट पालन, पशुधन प्रक्षेत्र, इतर जूने शेड व इमारती चे पाडकाम करून योग्य विल्हेवाट लावण्यास द्वि लिफाफा पद्धतीने लिलाव आयोजित करण्यात येत आहे. या बाबत दिनांक 12 ऑगस्ट 2025 रोजी सायंकाळी 5.00 वा. पर्यत सिलबंद लिफाफे स्विकारले जातील. बुधवार दिनांक 13 ऑगस्ट 2025 रोजी सकाळी 11.00 वा. सदर लिफाफे उघडण्यात येतील.

लिलावाच्या अटी व शर्ती महाविद्यालयाच्या www.covasaklmafsu.ac.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

दि. 29/07/2025

सहयोगी अधिष्ठाता,

**पशुवैद्यकीय व पशुविज्ञान महाविद्यालय, अकोला अधिनिस्त असलेले जुने कुक्कुट पालन, पशुधन प्रक्षेत्र, इतर जूने शेड व इमारतीचे पाडकाम करणे बाबत.**

## —: अटी आणि शर्ती :—

1. सदर शिकस्त कुक्कुटपालन पशुधन प्रक्षेत्र, इतर ठिकाणचे जुने शेड व ईमारतीची बुक व्हॅल्यू (शासकीय कींमत) च्या रक्कमे मधुन जिर्ण शेड व ईमारत पाडकाम (जमिनीच्या पातळीपर्यंत) किंमत वजा करून कीमान रू. 1,70,000/— (एक लक्ष सत्तर हजार फक्त) पेक्षा जास्त दर सादर करणे अनिवार्य राहील.

2. लिलाव करावयाचे **एकुण 12 जिर्ण शेड व इमारती/गोडाऊन** हया प्रत्यक्ष पाहण्यासाठी कार्यालयीन वेळेत सकाळी 11.00 ते सायंकाळी 5.00 च्या दरम्यान बघता येईल. त्यासाठी विभाग प्रमुख, कुक्कुटपालन यांना संपर्क साधावा.

3. कंत्राटदार/बोलीदार यांनी लिफाफा क्र. 1 मध्ये आधारकार्ड, पॅनकार्डची छायांकीत प्रत व इतर दस्तावेजा सोबतच अनामत रक्कम रू. 5,000/— चा धनाकर्ष (डी.डी.) सहयोगी अधिष्ठाता, पीजीआयव्हीएएस, अकोला (Associate Dean, PGIVAS, Akola) यांचे नावे व सोबत विहीत नमुन्यातील भरलेले हमीपत्र जोडणे बंधनकारक राहील.

4. लिलावाची अंतीम बोलीची अधिकतम रक्कम लिफाफा क्र. 2 मधे प्रपत्र कं. 2 मध्ये भरून सिलबंद लिफाफा समितीकडे सादर करतील.

5. लिफाफा कं. 1 व 2 वर ठळक अक्षरात नमुद करून अधोरेखीत करावी व सदर दोन्ही लिफाफे हया मोठया लिफाफा यात बंद करून सहयोगी अधिष्ठाता, पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, अकोला यांच्या कार्यालयात जमा करण्यात यावा.

6. यशस्वी बोलीदाराची सुरक्षा ठेव स्विकारलेल्या रकमेमध्ये समायोजीत केली जाईल. आणि इतर अयशस्वी बोलीदारांची अनामत रक्कम लिलाव प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर परत केली जाईल.

7. यशस्वी बोलीदारांना बोलीची पुर्ण रक्कम 02 दिवसात (14/08/2025) दुपारी 2 वाजेपर्यंत डीडी (धनाकर्ष) किंवा RTGS व्दारे यशस्वी बोलीदाराला भरावी लागेल. व न—भरल्यास सदर पाडकामाचा कोणताही भाग पाडण्याची परवानगी दिली जाणार नाही. पाडकामाची निविदा रद्द करण्यात येईल. पाडकामाच्या लिलावा बाबत कोणताही वाद उद्भल्यास गठीत समितीचा निर्णय अंतीम असेल.

8. सर्वोच्च बोलीदार पाडकाम व साहीत्य बोलीची 100 टक्के रक्कम आणि किंमती नुसार सर्व संबंधीत कर (लागू असल्यास) जमा केल्या नंतर 05 दिवसाच्या आत संपुर्ण पाडकाम हे जमिनीच्या पातळी पर्यंत करून साहित्य उचलणे बंधनकारक राहिल.

9. यशस्वी बोलीदार, लिलाव साहीत्याची देखरेखीची पुर्णपणे जबाबदारी घेईल.

10. डंपिंग साईटची व्यवस्था बोलीदाराने स्वतःच्या खर्चाने करावी लागेल.

11. लिलाव केलेल्या पाडकाम साहीत्याचे नुकसान/तोटा/चोरी यासाठी हे महाविद्यालय जबाबदार राहणार नाही.

12. पाडकाम, साहीत्य उचल करण्यासाठी शासकीय नियमानुसार वाहतुक करण्याची जबाबदारी यशस्वी बोलीदाराची राहील.

13. पाडकाम करतांना तसेच साहीत्य नेतांना बाल मजुर राहणार नाहीत याची नोंद घ्यावी. तसेच या संबंधीत कोणतीही व्यक्ती/कामगाराच्या जिवीताच्या हानीस सदर समिती तसेच हे महाविद्यालय जबाबदार राहणार नाही.

14. यशस्वी बोली रक्कम जमा केल्यानंतर तसेच पाडकामाची प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर कोणतीही तक्रार ग्राह्य धरल्या जाणार नाही.

15. अपवादात्मक परिस्थीतीत अटी आणि शर्ती शिथिल करण्याचे अधिकार सहयोगी अधिष्ठाता, पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय अकोला यांना राहतील.

16. लिलावाच्या प्रक्रीये मध्ये कोणतीही अडचण आल्यास या संबंधी कोणतेही कारण न देता निविदा स्विकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार सहयोगी अधिष्ठाता यांना राहील.

17. लिलावाची प्रक्रिया पुर्णपणे रद्द करण्याचे अधिकार मा. सहयोगी अधिष्ठाता यांना राहील.

18. लिलाव /निविदा इत्यादी संबंधी वाद उद्‌भवल्यास अकोला न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रात राहील.

**लिफाफा क्र. 1 मधे समाविष्ट असणारे कागदपत्रे**

1. आधार कार्ड
2. पॅन कार्ड
3. रू. 5000/— रकमेचा धनाकर्ष
4. हमिपत्र. (प्रपत्र क्र. —1)

**लिफाफा क्र. 2 मधे समाविष्ट असणारे कागदपत्रे**

1. लिलावाबाबतच्या दराचे प्रपत्र. (प्रपत्र क्र. —2)

**सहयोगी अधिष्ठाता,**

## प्रपत्र क्र. —1 (हमीपत्र)

पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, अकोला च्या परीसरातील जुने शिकस्त कुक्कुट पालन, पशुधन प्रक्षेत्र, इतर ठीकाणचे जूने शेड व इमारती चे पाडकाम करून योग्य विल्हेवाट लावण्यासाठी प्रकाशीत जाहीरात दि. 29/07/2025 मधे मी निम्न स्वाक्षरीकार नामे ______________________________ रा__________________________ बोलिदार म्हणुन सहभागी होण्यास इच्छुक असुन सदर लिलाव प्रक्रीयेतील सर्व अटी व शर्ती हया मी वाचुन व समजुन घेतलेल्या असुन त्या सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

मी स्वतः संबधीत सर्व शेड व इमारतींची पुर्णपणे पाहणी करून खातरजमा केल्यानंतरच सदर दर सादर करीत आहे. माझे दर मान्य झाल्यास, बोलीची रक्कम व त्याबाबतचे सर्व कर (लागु असल्यास) विहीत वेळेत भरणा करण्याची सर्व जबाबदारी ही माझी असेल. शेड/इमारत पाडकाम अथवा वाहतुक करतांना शासकीय नियमानुसार पात्र अशा वाहनानेच वाहतुक करण्याची मी हमी देत आहे. त्याबाबत कुठलीही अडचण उद्‌भवल्यास संपुर्ण जबाबदारी ही माझी असेल.

लिलाव आयोजित करणाऱ्या कार्यालयाशी माझे कुठलेही हीतसंबध नाहीत. व सदर प्रक्रीयेत मी फक्त एकच बोलीपत्र सादर केले असल्याची हमी देत आहे.

बोलीदाराची स्वाक्षरी

नाव

पत्ता

## प्रपत्र क्र. –2 (बोलीपत्र)

मा. सहयोगी अधिष्ठाता

पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय अकोला

विषयः– लिलावाबाबतचे बोलीपत्र सादर करण्याबाबत.

सदर्भ :– आपल्या कार्यालयाची दि. 29/07/2025 ची जाहीरात

मा. महोदय,

मी निम्न स्वाक्षरीकार संदर्भांकीत जाहीरातीला अनुसरून खालील प्रमाणे दर सादर करीत आहे.

| अ.क्र | कामाचा तपशिल | दर सर्व करांसहीत |
|---|---|---|
| 1 | पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, अकोला च्या परीसरातील जुने शिकस्त कुक्कुट पालन, पशुधन प्रक्षेत्र, इतर ठीकाणचे जूने शेड व इमारती चे पाडकाम करून योग्य विल्हेवाट लावुन स्क्रप साहीत्याचा लिलाव. **( जूने शेड व इमारतींची एकुण संख्या 12 )** | |

उपरोक्त दर हे एकुण 12 जूने शेड व इमारती हयांची मी स्वःता प्रत्यक्ष पाहणी केल्यानंतर सादर करीत आहे.

बोलीदाराची स्वाक्षरी

नाव.

पत्ता